महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
सातारा, सोमवार, दि. ३ एप्रिल २०१७
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ३.००

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# अर्चना गायकवाड यांची न्यायाधीशपदी निवड

तरडगाव : फलटण तालुक्यातील तरडगाव येथील अर्चना मनोज गायकवाड यांची कनिष्ठ स्तर न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीपदी निवड झाली. ही निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून झाली.



अर्चना गायकवाड

अर्चना गायकवाड यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोरेगाव तालुक्यातील तडवळे येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात पूर्ण झाले. पुढील शिक्षण सातारा, बारामती, फलटण या ठिकाणी झाले.

गेल्या चार-पाच वर्षांपासून त्या फलटण न्यायालयात वकील म्हणून कार्यरत आहेत. त्यांना यशवंत गायकवाड, दत्तात्रय भोईटे, संजय भोईटे यांचे मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल त्यांचे विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांच्याकडून कौतुक करण्यात आले. (वार्ताहर)